॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

'A' Grade
NAAC Re-accredited
(4th Cycle)

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. ३ जून : जागतिक सायकल दिनाच्या निमित्ताने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, मेरा भारत युवा केंद्र, जळगाव व जळगाव सायकलिस्ट ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने आज ३ जून, २०२६ रोजी सकाळी ७.३० वाजता भव्य सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण संवर्धन, इंधन बचत आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देणाऱ्या या रॅलीला विद्यार्थी, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना सायकलचा अधिकाधिक वापर करण्याचे केलेले आवाहन लक्षात घेऊन या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारापासून कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या हस्ते हिरवा झेंडी दाखवून रॅलीला प्रारंभ करण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी सायकल चालविण्याचे आरोग्यदायी फायदे, पर्यावरण संरक्षणातील तिची भूमिका तसेच इंधन बचतीसाठी सायकलचा वापर वाढविण्याची गरज अधोरेखित केली. सायकल ही केवळ वाहतुकीचे साधन नसून निरोगी जीवनशैलीचा पाया असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, महापौर दिपमाला काळे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक प्रा. प्रविण महाले, ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. चंद्रशेखर वाणी, मेरा भारत युवा केंद्राचे युवा अधिकारी अभिषेक चौरे, प्रा. डी. एस. दलाल, प्रा.डॉ. मनोज पाटील, अभियंता राजेश पाटील, प्रा. एस. टी. बेंद्रे, प्रा. रत्नमाला बेंद्रे, प्रा. पी. पी. पाटील, जळगाव सायकलिस्ट ग्रुपचे अध्यक्ष निलेश चौधरी, उपाध्यक्ष रुपेश महाजन, सुभाष पवार, धुलिया सायकल मार्टचे संचालक समीर रोकडे यांच्यासह विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, विद्यार्थी, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी तसेच शहरातील सायकलप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या रॅलीतून पर्यावरणपूरक वाहतूक, निरोगी जीवनशैली आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा प्रभावी संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी जळगाव सायकलिस्ट ग्रुपचे पदाधिकारी तसेच राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे शरद पाटील, कैलास औटी, विलास पाटील, सौरभ साबळे, विजय बिऱ्हाडे आणि अन्य कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

..............................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ — दिनांक: ३ जून, २०२६

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता